

बबनराव झिंझुर्डे यांना सहकार भुषण पुरस्कार

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

शुक्रवार दिनांक 13/06/२०२५

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 129 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# अहमदाबाद विमान अपघातात सर्व 242 प्रवाशांचा मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

अहमदाबाद येथून लंडनला जाणाऱ्या विमानाचा टेक ऑफनंतर अवघ्या पाच मिनिटांत अपघात झाला. या अपघातात २४२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त होत होती जी खरी ठरली आहे. २४२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती पोलिसांनी व्यक्त केली आहे. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे. आज दुपारच्या सुमारास हा अपघात झाला. विमानाने टेक ऑफ घेताच अवघ्या काही मिनिटांत विमानाचा अपघात झाला आणि ते कोसळलं. या घटनेत सर्वच्या सर्व प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती आता पोलिसांनी व्यक्त केली आहे.विमानात नेमके किती प्रवासी, क्रू मेंबर्स होते?अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानात एकूण २४२ प्रवासी होते, अशी माहिती डीजीसीएच्या





निवेदनात देण्यात आली आहे. त्याशिवाय, या विमानात २ वैमानिक व १० केबिन क्रू मेंबर्स होते, असंही या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. कॅप्टन सुमीर सभरवाल हे या विमानाचे वैमानिक होते. त्यांना ८ हजार २०० तासांच्या उड्डाणांचा अनुभव आहे. त्याशिवाय केबिन क्रूलादेखील ११०० तासांच्या उड्डाणांचा अनुभव आहे, असं एअर इंडियाने निवेदनात म्हटलं आहे. PlayUnmuteFullscreenअनेक मृतदेह जळून खाक, ओळख पटणवणं कठीणविमान अपघातामुळे मृतदेह जळून खाक झाले आहेत. अनेक मृतांची ओळख पटणं बाकी आहे.

आता डीएनए टेस्टद्वारे मृतांची ओळख पटवली जाईल. मृत्यू झालेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांना, कुटुंबीयांना बोलवून डीएनएद्वारे ओळख पटवली जाईल. गुजरातच्या आरोग्य सचिवांनी सांगितलं की अनेक मृतदेह असे आहेत ज्यांची ओळख पटवणं अगदीच कठीण झालं आहे. अहमदाबाद रुग्णालय, तसंच हॉस्टेल या ठिकाणी जे जखमी झाले त्यांना आम्ही रुग्णालयात आणलं आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

# विमानप्रवासी व नागरिकांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्र व देश दु:खी

## -उपमुख्यमंत्री अजित पवार

गुजरातच्या अहमदाबाद विमानतळावरुन लंडनला निघालेलं एअर इंडियाचं विमान अहमदाबाद शहरातील इमारतींवर कोसळून झालेल्या अपघातात प्रवासी तसेच स्थानिक नागरिकांचा झालेला मृत्यू धक्कादायक, क्लेशदायक, दुर्दैवी घटना असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अपघाताबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. अहमदाबाद शहरातील या विमान अपघातामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देश आज दु:खी असून मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात प्रत्येक महाराष्ट्रवासी सहभागी असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात पुढे म्हणाले की, अहमदाबादहून लंडनला जाणारं एअरइंडियाचं विमान उड्डाणानंतर थोड्याच वेळेत अहमदाबाद शहरातील



इमारतींवर कोसळलं. ती संपूर्ण दुर्घटना धक्कादायक, क्लेशदायक होती. गुजरात पोलिस, अग्निशमन, ॲम्ब्युलन्स सेवा, वैद्यकीय पथकांनी, सुरक्षादलांनी दुर्घटनास्थळी पोहचून तातडीने बचाव व मदतकार्य तातडीने राबवलं. परंतु झालेली जिवितहानी खुप मोठी असून ती भरुन निघणार नाही. अपघाताचं निश्चित कारण अद्याप कळलं नसलं तरी चौकशीअंती ते स्पष्ट होईल. परंतु अशा घटनांची

पुनरावृत्ती टाळण्यासाठी पावलं उचलण्याची गरज आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी साहेबांनींही विमान दुर्घटनेची गंभीर दखल घेतली आहे. गुजरातच्या मुख्यमंत्र्यांकडून अपघाताची संपूर्ण माहिती घेऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना गुज रातला पाठवले. या दुर्घटनेच्या निमित्तानं विमानसेवेच्या सुरक्षिततेकडे अधिक गांभीर्यानं लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. विमानसेवा कंपन्यांनी त्यांच्या विमानसेवेच्या सुरक्षेचा फेरआढावा घेऊन, सुरक्षितता मानकांचे पालन करुन भविष्यात अशी दुर्घटना होणार नाही, हे सुनिश्चित करावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे.

दरम्यान, अकोला, बुलडाणा दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपले कार्यक्रम साध्या पद्धतीने घेत दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या प्रवाशांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 13/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पर्यटकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्या

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मावळ - पावसाळ्यात लोणावळा, कार्ला, आंदर, पवन, नाणे मावळात मोठ्या संख्येने पर्यटक फिरण्यासाठी येतात. पर्यटकांना सुविधा द्याव्यात. त्यांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. पार्किंगच्या जागेत पाणी साचते. तिथे मुरुम टाकून दुरुस्ती करुन घ्यावी. पोलिसांनी पर्यटकांना केवळ धाक दाखवू नये. पर्यटकांना सुविधा द्यावी. चुकीचे कृत्य करणाऱ्या पर्यटकावर कारवाई करावी. अतिउत्साही पर्यटक धबधब्याखाली पाण्यात उतरतात. त्यासाठी कर्मचारी वाढवावेत. वाहतूक कोंडी होणार नाही, याची खबरदारी घ्यावी अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



खासदार श्रीरंग बारणे हे विधानसभानिहाय बैठक घेत आहेत. त्यानुसार मावळ विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक गुरुवारी वडगाव येथील पंचायत समिती कार्यालयात पार पडली. या बैठकीला प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, मावळ तहसीलदार विक्रम देशमुख, गट विकास अधिकारी कुलदीप प्रधान, वडगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रवीण निकम, तळेगावचे मुख्याधिकारी विजय सरनाईक, लोणावळा नगरपरिषदचे मुख्याधिकारी अशोक साबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजय पाटील, क्षीरसागर उप, धनराज दराडे, कविता पाटील, पोलीस निरीक्षक प्रभापती पाटील, पोलीस उपनिरीक्षक दिपाली पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजया म्हेत्रे, कृषी अधिकारी मारुती साळे, माजी सभापती गुलाब म्हाळस्कर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख शरदराव हुलावळे, शिवसेना तालुका प्रमुख राजाभाऊ खांडभोर, शिवसेना उप तालुका प्रमुख राम सावंत, अमित कुंभार, धनंजय नवघने, देहूगाव शिवसेना शहर प्रमुख सुनील हगवणे, युवासेना उप जिल्हा प्रमुख दत्ताभाऊ केदारी, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, युवासेना तालुका प्रमुख राजेश वाघोले, माजी नगरसेविका कल्पना आखाडे, माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, मनीषा भांगरे, नितीन कुडे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, महसूल, कृषी, पाणीपुरवठा सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, सार्वजनिक बांधकाम विभागाने चालू असलेल्या रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत. रस्त्यावरील खड्डे बुजवावेत. पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. आई एकविरा देवीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचा दर्जा राखला जात नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. कामाच्या दर्जा राखावा, कामाला गती देऊन पूर्णत्वाकडे न्यावे. कार्ला ते मळवली दरम्यानचा रस्ता अर्धवट आहे. तो पूर्ण करावा. भाजे लेणीपासून लोहगड, विसापूर किल्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे कामही अर्धवट आहे. ते पूर्ण करावे. जिल्हा परिषदे अंतर्गत सुरु असलेले रस्त्यांची कामेही तातडीने पूर्ण करावीत. जलजीवन मिशनअंतर्गत मावळ मतदारसंघात सुरु असलेल्या कामांमध्ये अनेक त्रुटी आहेत. याबाबत काही ग्रामपंचातीच्या तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे कामास सुधारणा करावी. दर्जेदार काम करावे. ठेकेदारांनी काम वेळेत पूर्ण केले नाही. अशा ठेकेदारांवर कारवाई करावी. त्यांना काळ्या यादीत टाकावे. त्यांच्याकडून पैशांची वसुली करावी.

मावळातील अवैध धंदे बंद झाले पाहिजेत. धाब्यावर अवैधपणे मद्य विक्री केली जाते. मावळात एमडी ड्रग मोठ्या प्रमाणात विकले जाते. शाळांजवळ गुटखा विक्री केली जाते. त्यावर कारवाई करावी. साथीचे आजार वाढू नयेत यासाठी औषध फवारणी करावी. पावसाळ्यात होणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी काही काळजी घ्यावी याबाबत आरोग्य विभागाने जनजागृती करावी. महावितरणने पावसाळ्यापूर्वी झाडांची छाटणी करुन घ्यावी. ज्या ठिकाणी डीपीची मागणी आहे, तेथे डीपी बसवावेत. पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी घ्यावी. जनजागृती करुन सुर्यघर आणि कुसूम योजना लोकांपर्यंत पोहचवावी. बियाणे, खतांची विक्री चढ्या दराने होणार नाही, याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करावी, अशा सूचना खासदार बारणे यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

# राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रमांचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी (प्रतिनिधी): महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री. राज साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहर मनसेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वाढदिवसाच्या नियोजना संदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनसेचे नेते गणेश आप्पा सातपुते व महेश बैसाने यांनी मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.अशी माहिती शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. राजसाहेब ठाकरे यांच्या



पर्यावरणविषयक जाणीवेचे अनुकरण करत, त्यांच्या वाढदिवस दिनी म्हणजेच दि.१४ जून २०२५ रोजी, पिंपरी चिंचवड शहरातील विविध ठिकाणी १००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या उपक्रमात मनसेचे पदाधिकारी कार्यकर्ते, स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शहराचे पर्यावरण सुधारण्यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल असून, प्रत्येक नागरिकाने यात सहभाग घ्यावा, असे आवाहन मनसेने केले आहे.

दरम्यान, दि. २५ जून २०२५ रोजी, अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी, पिंपरी चिंचवड, पुणे येथे महारोजगार व रोजगाराभिमुख प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत होणाऱ्या या मेळाव्यात नामांकित कंपन्या, औद्योगिक संस्था, प्रशिक्षण केंद्रे व विविध क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. या उपक्रमात रोजगाराच्या संधींबरोबरच विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती व नोंदणीची सुविधा उपलब्ध असणार आहे. हा मेळावा नवयुवक, बेरोजगार, महिला व विविध क्षेत्रातील इच्छुकांना स्वतःची क्षमता वाढविण्याची आणि रोजगाराच्या संधी मिळविण्याची सुवर्णसंधी आहे. या दोन्ही उपक्रमांमधून मनसेच्या सामाजिक बांधिलकीचा व सकारात्मक बदल घडविण्याच्या दृष्टिकोनाचा प्रत्यय येतो. पिंपरी चिंचवडमधील सर्व नागरिकांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी केले आहे.

# डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन प्रशालेतील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बोपोडी, /पुणे : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन प्रशाला, बोपोडी येथे सन १९९८-१९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा बुधवार, दि. ११ जून २०२५ रोजी उत्साहात व आठवणींनी भरलेल्या वातावरणात संपन्न झाला. तब्बल २६ वर्षांनंतर शालेय मित्र-मैत्रिणी, गुरुजन आणि शिक्षक पुन्हा एकत्र आल्याने वातावरण भारावून गेले होते.




कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषणाने झाली, त्यानंतर जुन्या आठवणींचा अक्षरशः पाऊस पडला. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय आठवणी, शिक्षणप्रवास आणि आजच्या यशस्वी वाटचालीचा अनुभव शेअर केला. गुरुजनांचा सन्मान करताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. यावेळी शिक्षक कमलाकर पाटील, रंजना टंकसाळे, वाल्मीक हजारे , सिताराम वाघ , देवेदास सरोदे , जयराम पारधी , गीते सर , कर्णे मॅडम यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी, शाळेचे शिपाई ते आता पुणे महापालिकेचे अतिक्रमण विभागाचे आयुक्त सोमनाथ बनकर साहेब, प्रभारी प्राचार्य जीवन कांबळे आदी उपस्थित होते.

या प्रसंगी शिक्षकांनी देखील मार्गदर्शनपर विचार व्यक्त करत सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. जुन्या फोटोंचे प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम व अल्पोपहाराचा आनंद सर्वांनी लुटला.

कार्यक्रमाचे आयोजन १९९८-९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी केले होते, आणि उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार मानत, पुन्हा एकदा अशाच भेटीचे वचन देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# पालखी सोहळ्यासाठी राबविण्यात येणार स्वच्छता उपक्रम

## महापालिकेबरोबरच स्वंयंसेवी संस्थांचा पुढाकार...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आरोग्य व स्वच्छता सुविधा पुरविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.




पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीची नियोजन बैठक दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीस महापालिका उपआयुक्त सचिन पवार अध्यक्षस्थानी होते.बैठकीस महापालिकेचे माजी नगरसदस्य जयंत बागल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे , सहाय्यक आरोग्याधिकारी किशोर दरवडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, सुधीर वाघमारे, तानाजी दाते, शांताराम माने, राजेश भाट, महेश आढाव, कुंडलिक दरवडे,अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक श्रीराम गायकवाड तसेच संस्कार प्रतिष्ठान, गुणवंत कामगार मंडळ, वारकरी मंडळ, मराठवाडा सेवा संस्था, पिंची, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, निसर्ग संवर्धन मंडळ, संत निरंकार मंडळ (पिंपरी व भोसरी), सायकल मित्र मंडळ आदी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत पुढील गोष्टींवर सविस्तर चर्चा व नियोजन करण्यात आले:* स्वच्छ व सुरक्षित सार्वजनिक स्वच्छतागृहांची मोफत उपलब्धता तसेच त्यांची स्वच्छता तसेच परिसरात आवश्यकतेनुसार जंतू नाशक फवारणी * पिण्याच्या पाण्याची सोय

* आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिरे* फराळ वाटप* स्वयंसेवकांच्या सहाय्याने रस्ते व परिसर स्वच्छता* पालखी मार्गावर विशेष स्वच्छता पथकांची नेमणूक

महापालिका व स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून पालखीच्या आगमनपूर्व आणि प्रस्थानानंतरही परिसर स्वच्छ ठेवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश शहरात शिस्तबद्ध, सुरक्षित व स्वच्छ वातावरणात पालखी सोहळा पार पाडणे हा आहे.

उप आयुक्त सचिन पवार यांनी या उपक्रमासाठी सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्थांचे आभार मानले असून, पालखी मार्गावर विशेष स्वच्छता पथक नेमण्याच्या सूचनाही यावेळी दिल्या.

महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांच्या सेवेबरोबरच सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी नागरिकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे आवाहन आरोग्य विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 13/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिं.चिं.महानगरपालिका हद्दीमधील विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,मुंबई यांच्यामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचालित सावित्रीबाई फुले अकादमी,वाकड तसेच इतर प्रशासकीय पुर्व प्रशिक्षण संस्थामध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२६ साठी पुर्णवेळ विनामुल्य निवासी प्रशिक्षण देण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेचे २७ जुलै २०२५ रोजी आयोजन केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रहिवासी पुरावा असलेल्या सर्व संवर्गातील ५० विद्यार्थ्यांना सावित्रीबाई अकादमीमध्ये ११ महिन्याकरिता प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना विनामुल्य निवास व्यवस्था, प्रतिमहा रु.४०००/- प्रमाणे विद्यावेतन, अद्ययावत पुस्तकांसह ग्रंथालय, एसी अभ्यासिका,व्याख्यानकक्ष इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत तसेच तज्ञांचे मार्गदर्शन देखील उपलब्ध करुन देण्यात येते.




या प्रवेश पक्रीयेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुरूवात ३ जुन पासुन झाली असुन २७ जुन २०२५ पर्यंत ही मुदत आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याकरिता www.siac.org.in , www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

तसेच अधिक माहितीसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले अकादमी वाकड यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान श्री.रंगनाथ नाईकडे,संचालक,

सावित्रीबाई फुले अकादमी यांच्या मार्फत करण्यात आले आहे.

# बबनराव झिंझुर्डे यांना सहकार भुषण पुरस्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

लक्ष्मीनगर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव खंडु झिंझुर्डे यांना सहकार भुषण पुरस्कार देण्यात आला. पतसंस्थेचा २२ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा झाला. पतसंस्थेचा दिनांक ०६ जुन, २००३ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते उद्घाटन झालेल्या लक्ष्मीनगर पतसंस्थेचा २२ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



पतसंस्थेच कामकाज २७ लाखांच्या खेळत्या भांडवलावर सुरु झालेल्या संस्थेने आज २४ कोटींच्या ठेवी व १८ कोटींचे कर्ज वाटप करून ४५ कोटींकडे यशस्वी वाटचाल करीत आहे. पतसंस्थेच्या स्थापनेपासुन संस्थेचा ऑडिट वर्ग 'अ' असुन थकबाकी नाममात्र आहे. पतसंस्थेच्या वाढीचा आलेख पाहुन व कामकाजाचा आढावा घेवुन त्यांनी संस्थेची प्रशंसा करून समाधान व्यक्त केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेच्या वतीने समाजभुषण पुरस्कार पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हनुमंत गावडे,. गबाजी वाकडकर संचालक प्रेरणा बँक यांना देण्यात आला व आदर्श माता पुरस्कार श्रीमती अश्विनी चिंचवडे, मा. नगरसेविका, श्रीमती. अलका लोंढे व श्रीमती सुनिता शिंदे यांना देण्यात आला. या प्रसंगी आमदार सुनिल शेळके, आमदार शंकर जगताप, श्री. भाऊसाहेब भोईर श्री. नामदेव ढाके, श्री. सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, श्री. तुकाराम गुजर, मा. एकनाथ टिळे, मा. कांतीलाल गुजर मा. शेखर चिंचवडे, श्री. अजिंक्य टिळे असे मान्यवर तसेच परिसरातील नागरीक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मानपत्र वाचन नाना शिवले (सर) यांनी केले व कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष श्री. श्रीधर वाल्हेकर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सचिन वाल्हेकर व आभार प्रदर्शन श्री. गाडेकर यांनी केले.

या वेळी हनुमंत गावडे, बबनराव झिंजुर्डे, श्रीधर वाल्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968